शैक्षणिक संदर्भ अंक १४८ (जून - जुलै २०२४)

# ...अशा रीतीनं आपण वेळ पाळू लागलो


लेखक : यशोधन जोशी



# ...अशा रीतीनं आपण वेळ पाळू लागलो

**लेखक : यशोधन जोशी**

आज आपण कॉम्प्युटर किंवा मोबाईलवर टाईमझोन निवडताना अतिशय सराईतपणे 'चेन्नई, कोलकाता, मुंबई, न्यू दिल्ली' असा टाईमझोन निवडतो. पण सव्वाशे वर्षांपूर्वी यावरून मुंबईत भयंकर खळबळ माजलेली होती आणि ब्रिटिश सत्ता व एतद्देशीयांकडून चालवल्या जाणाऱ्या स्वायत्तसंस्था यांच्यात संघर्ष घडून आलेला होता.




इ.स. १८८३. भारतात राणीचा अंमल सुरू होऊन पावशतक उलटून गेलेले होते. भारतावरचा ब्रिटिश अंमल पक्का करण्यासाठी रेल्वे व टपालसेवा सुरू झालेल्या होत्या. बॉम्बे, मद्रास व कलकत्ता प्रेसिडेन्सी एकमेकांशी रेल्वेने जोडल्या गेल्यावर एक बिकट प्रश्न निर्माण झाला.

भारतातील सर्व व्यवहार व कालगणना हे सूर्योदय व सूर्यास्त या साध्या सोप्या हिशोबावर चालत होते. सूर्योदय व सूर्यास्ताच्या स्थानिकवेळा पूर्व आणि पश्चिम भारतात साहजिकच निरनिराळया होत्या. त्यामुळे रेल्वे व तारखाते यांना या वेळेतील अंतराचा फटका बसू लागला. वेळापत्रकात गडबड होऊ लागली. यावर तोडगा काढण्याची गरज निर्माण झाली. इथून तिथून भारतभर एकच वेळ असली पाहिजे, मग मुंबई आणि कलकत्ता यांच्या अदमासे मधोमध मद्रास येते, तेव्हा मद्रासची वेळ ही प्रमाणवेळ (Indian Mean Time) म्हणून सर्वत्र लागू करावी, असा फतवा भारताच्या व्हाईसरॉयने काढला. मुंबई इलाख्याचा गव्हर्नर फर्ग्युसनने ताबडतोब या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले आणि आदेश दिला की, १ डिसेंबर १८८२ पासून मुंबई इलाख्यात सर्वत्र 'मद्रास टाईम' लागू होईल व सर्व सरकारी कामकाज मद्रास टाईमप्रमाणे चालेल. मद्रास आणि मुंबईच्या वेळांत ३९ मिनिटांचा फरक होता. (मद्रास मुंबईपेक्षा ३८ मिनिटे ५० सेकंदांनी पुढे होते)

त्याकाळात प्रत्येकाच्या हातात घड्याळ नसे, वेगवेगळया ठिकाणी बसवलेल्या




घड्याळांबरहुकूम मुंबईकरांचे वेळापत्रक चाले. या घड्याळातले सर्वात महत्त्वाचे घड्याळ होते मुंबई विद्यापीठावरच्या टॉवरवरचे, अर्थात राजाबाई टॉवरवरचे. हा टॉवर आणि घड्याळ जरी विद्यापीठाच्या अखत्यारीत असले तरी या टॉवरच्या देखभालीची जबाबदारी बॉम्बे प्रेसिडेन्सीकडे होती.

विद्यापीठाचे कामकाज कोणत्या वेळेनुसार चालवावे व टॉवरवरच्या घड्याळात कोणती वेळ ठेवावी, याबद्दल स्वायत्त संस्था असणाऱ्या मुंबई विद्यापीठात सर्व समिती सदस्यांचे मतदान घेण्यात आले आणि ३४ विरुद्ध ६ अशा मतांनी विद्यापीठाचे कामकाज 'बॉम्बे टाईम'प्रमाणे चालवावे असा ठराव मंजूर झाला. वैशिष्ट्य म्हणजे ठरावाच्या बाजूने जी ३४ मते पडली त्यात १० मते युरोपिअन लोकांची होती. मुंबई विद्यापीठाने या ठरावाची एक प्रत गव्हर्नरकडे पाठवून दिली. यावर संतापून फर्ग्युसनने 'यापुढे राजाबाई टॉवरच्या देखभालीचा खर्च सरकारतर्फे केला जाणार नाही', असा वटहुकूम जारी केला केला. मुंबईत अशीही अफवा पसरली, की राजाबाई टॉवर आता सरकार आपल्या ताब्यात घेणार असून नंतर त्यावरची वेळ बदलली जाईल.



नोकरशाही आणि नागरी संस्था यातच असा वाद निर्माण होऊ लागल्याने मोठा पेच निर्माण झाला. हा पेच सोडवण्याच्या हेतूने बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्सने पुढाकार घेतला आणि फर्ग्युसनला एक पत्र लिहिले. पत्रात असे म्हटले होते की, 'सर्वसामान्य जनतेला ही नवीन वेळ मान्य नाही. शिवाय एकाच शहरात दोन वेळा असणे हे फारच गैरसोयीचे आहे.' एव्हाना नोकरशाहीतील काही

वरिष्ठ अधिकारीही बॉम्बे टाईमबाबत अनुकूल झाले होते. फर्ग्युसननेही हे ओळखून स्वतःचा आब राखत १ जून १८८३ पासून सर्व कामकाज पुन्हा बॉम्बे टाईमनुसार करण्याचा आदेश दिला. पण यातसुद्धा त्याने एक पाचर मारून ठेवलेली होती, फक्त मुंबई शहराची वेळ बॉम्बे टाईमप्रमाणे चालणार होती बाकी सर्व इलाख्यात मद्रास टाईमच चालू रहाणार होता. मुंबई शहराच्या बाहेरचा भाग म्हणजे वांद्र्याच्या उत्तरेकडच्या भागात मद्रास टाईमच चालू रहाणार होता. यामुळे मुंबई व आसपासचा भाग दोन वेगवेगळ्या टाईमझोनमध्ये विभागला गेला.




मुंबई इलाख्यात मुंबईशिवाय कराची हे अजून एक महत्त्वाचे शहर होते. कराचीमधील स्थानिक वेळ मद्रास टाईमपेक्षा ५२ मिनिटांनी मागे होती. त्यामुळे सिंध सभा व कराची चेंबर ऑफ कॉमर्सने गव्हर्नरला विनंती करून ऑगस्ट १८८४ पासून स्थानिक वेळ वापरण्याची परवानगी मिळवली.

मुख्य व्यापारी शहरातील वाद मिटल्याने मुंबई इलाख्यात शांतता निर्माण झाली पण ही शांतता फार काळ टिकली नाही. जेमतेम दोन तपांतच पुन्हा एकदा हा वाद उफाळून आला.

मध्यंतरीच्या वीस वर्षांच्या काळात जगभरातील सर्व प्रमुख देशांत व्यापाराच्या दृष्टीने एक प्रमाणवेळ निर्माण होणे गरजेचे आहे, यावर एकमत होऊन त्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. यानुसार इंग्लडमधील ग्रीनीच हा मध्यबिंदू मानून वेळेचे गणित मांडण्यास सुरुवात झाली. यावरून 'ग्रीनीच मेरिडीअन टाईम (GMT)' सुरू झाला. याशिवाय 'युनिव्हर्सल टाईम (UTC)' ही नवीन संज्ञा उपयोगात आणून टाईमझोनप्रमाणे कालगणना सुरू झाली. सर्व प्रमुख देशांनी या संकल्पना मान्य करून नवीन वेळेनुसार आपापली प्रमाणवेळ बदलली. भारताच्या व्हाइसरॉयसमोरही हा वेळ बदलाचा प्रस्ताव ठेवला गेला पण त्यावर विचार करून तत्कालीन व्हाइसरॉयने भारतातील वेळ बदलण्याचा प्रस्ताव तात्पुरता पुढे ढकलला. हे साल होते १८९९.

१९०५ साली व्हाइसरॉय कर्झनने मात्र रेल्वे व पोस्ट खात्यासाठी तसेच मुंबई, कलकत्ता आणि कराची या महत्त्वाच्या शहरांकरीता GMT प्रमाणे कालगणना बदलण्यास मंजुरी दिली व ३० जून १९०५ पासून या शहरांत सरकारी कचेऱ्यांनी नवीन वेळेनुसार कामकाज सुरू करावे, असा आदेश दिला. या नवीन वेळेला 'स्टँडर्ड टाईम' असे संबोधले जाऊ लागले. स्टँडर्ड टाईम व बॉम्बे टाईममध्ये पुन्हा ३९ (३८ मिनिटे ५० सेकंद) मिनिटांचा फरक पडू लागला.

बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्सने स्टँडर्ड टाईम लागू करण्याबाबत मतदान घेतले. सुरुवातीला हा ठराव फेटाळला गेला पण ऑगस्ट १९०५ ला झालेल्या फेरमतदानात स्टँडर्ड टाईम स्वीकारला गेला. बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स पाठोपाठ बॉम्बे पोर्ट ट्रस्ट, फायर इन्शुरन्स एजंट असोसिएशन, नेटीव्ह शेअर ब्रोकर्स असोसिएशन, मिल मालक संघटना यांनीही स्टँडर्ड

टाईमप्रमाणे कामकाज करण्यास मान्यता दिली. मुंबई महानगर पालिकेनेही २६ विरुद्ध २१ मतांनी स्टँडर्ड टाईम स्वीकारला. फक्त कॉटन एक्सचेंज, किरकोळ वस्तूंचे व्यापारी आणि धान्य व्यापारी यांच्या संघटनांनी बॉम्बे टाईमच पाळण्याचा निर्णय घेतला.

सर्वसामान्य जनतेला मात्र हा वेळेतील बदल फारसा पसंत पडला नाही. रेल्वे व प्रवासी लोकांच्या सोयीकरता मुंबई शहराने आपली वेळ बदलणे हे सयुक्तिक नाही, असा सूर निघू लागला. मुंबई आता दोन वेळा पाळू लागली. एक बॉम्बे टाईम आणि दुसरा स्टँडर्ड टाईम. सरकारी कार्यालये आता १० ते ५ ऐवजी १०.३० ते ५.३० अशा स्टँडर्ड वेळेप्रमाणे चालू लागली. व्हिक्टोरिया अँड प्रिन्सेस डॉकयार्डच्या घड्याळाचे टोले पूर्वी ७.५१ ला पडत आता ते ८.३० वाजता पडू लागले. रेल्वे पकडण्यासाठी लोक वेळेआधी अर्धा तास निघू लागले. कोणतीही वेळ लिहिताना बॉम्बे टाईम व स्टँडर्ड टाईम दोन्ही लिहिले जाऊ लागले.

मिल मालकांच्या असोसिएशनने स्टँडर्ड टाईम पाळण्याचा निर्णय जानेवारी १९०६च्या सुरुवातीला म्हणजे थोडा उशिराच घेतला. ५ जानेवारी १९०५ ला जेकब ससून मिलचे कामगार कामासाठी मिलच्या गेटवर सकाळी पोहोचले तर त्यांना आज मिल ५.३० ला नाही तर ६.१० सुरू होईल व दिवस संध्याकाळी ६.१० ला संपेल असे समजले. यांत त्यांच्या कामाच्या तासांत कोणताही फरक पडणार नव्हता तरीही या कामगारांत असंतोष पसरला व ४५०० मिलमजूर संपावर गेले. हे लोण इतर गिरण्यांत पसरणार असे दिसताच मिल मालकांनी पुन्हा बॉम्बे टाईम पाळण्याचा निर्णय घेतला.

कामकाजासोबतच धार्मिक गोष्टींवरही स्टँडर्ड टाईमचा परिणाम होऊ लागला आणि त्यामुळेही त्या विरोधात जनमत निर्माण होऊ लागले. मुंबईत सूर्य दुपारी डोक्यावर येण्याची

वेळ साधारणतः १२.३० असे त्या वेळेनुसार हिंदू, मुस्लिम व ज्यू आपापल्या प्रार्थना करत. पण ३९ मिनिटांच्या फरकाने बॉम्बे टाईमनुसार हे विधी सकाळी ११.५१ लाच पार पाडावे लागू लागले. यावेळी सूर्य डोक्यावर आलेला नसे त्यामुळे धार्मिक कार्यांसाठी मुख्यत्वे बॉम्बे टाईमच पाळला जाऊ लागला. मुस्लिमांत बोरा व सुन्नी समाजाने बॉम्बे टाईमप्रमाणेच आपल्या प्रार्थनेच्या वेळा ठेवल्या. खोजा समाज मात्र स्टँडर्ड टाईमप्रमाणे नमाज पढत असे.

मुंबईत सामान्य जनता या निर्णयाविरोधात एकवटू लागली. माधवबागेत हजारोंच्या सभा होऊ लागल्या. मुंबई महानगरपालिकेत वेळ बदलासाठी दुसऱ्यांदा मतदान झाले. सुरुवातीला स्टँडर्ड टाईमला कौल देणाऱ्या सभासदांनी दुसऱ्या वेळेला मात्र बॉम्बे टाईमच्या बाजूने कौल दिला. फिरोजशाह मेहता हे त्यावेळी मुंबई महानगरपालिकेचे सदस्य होते आणि सुरुवातीपासूनच बॉम्बे टाईमबाबतीत आग्रही होते. महानगरपालिकेत फिरोजशाह मेहता व त्यांचे अनुयायी आणि काँग्रेसचे इतर सदस्य असे दोन गट पडले. काँग्रेसच्या सदस्यांना टिळकांचा पाठिंबा होता.



महानगरपालिकेच्या बॉम्बे टाईम पाळण्याचा निर्णयामुळे महानगरपालिकेच्या अखत्यारीतील सर्व घड्याळे बॉम्बे टाईमप्रमाणे चालतील हे निश्चित झाले. यामुळे व्हिक्टोरिया टर्मिनसचे घड्याळ स्टँडर्ड टाईम दाखवत असे तर तेथून जवळच असणाऱ्या मुंबई महानगरपालिकेतील सर्व घड्याळे मात्र बॉम्बे टाईम दाखवत असत.

मुंबईतील वर्तमानपत्रात किंवा इतर ठिकाणी वेळ लिहिताना बॉम्बे टाईम आणि स्टँडर्ड टाईम लिहिण्याची पद्धत सुरू झाली.

मुंबईतील सर्व वर्तमानपत्रे सुरुवातीपासूनच बॉम्बे टाईमबद्दल आग्रही होती. यांतील खबरदार, सुलतान-ए-अखबार, पारशी आणि मुस्लिमांचे मुखपत्र अनुक्रमे  जाम-ए-जमशेद आणि अखबार-ए-इस्लाम ही वर्तमानपत्रे इतर बाबतीत ब्रिटिश सरकारची समर्थक होती हे विशेष.

फिरोजशाह मेहतांनी सार्वजनिक सभांमध्ये भाषणे करून स्टँडर्ड टाईमला उघडपणे विरोध सुरू केला. त्यांनी सरकारला धारेवर धरताना प्रश्न उपस्थित केला, की भारतासारख्या विशाल देशाला एका स्टँडर्ड टाईममध्ये बसवणे हे कोणत्या शास्त्रीय कारणाने सिद्ध करता येते? कोणताही देश जो भारताएवढा विशाल आहे त्याने संपूर्ण देशात एकच स्टँडर्ड टाईम स्विकारला आहे काय?

या प्रश्नांची उत्तरे ब्रिटिश सरकारने कधीच दिली नाहीत किंबहुना भारतात सत्तेच्या जोरावर आपला निर्णय लादणे हेच यामागचे उद्दिष्ट होते. मुंबई व कलकत्ता या दडपशाहीसमोर न झुकता आपल्या स्थानिक वेळेच्या वापरावरच ठाम राहिले.

१९४७ ला भारताच्या स्वातंत्र्यानंतर स्टँडर्ड टाईम हीच भारताची अधिकृत वेळ ठरवली गेली तरीही कलकत्ता १९४८ पर्यंत आणि मुंबई १९५५ पर्यंत आपापल्या स्थानिक वेळेनुसारच आपले व्यवहार पार पाडत होते.

मद्रासला असणारी सेन्ट्रल ऑब्झर्वेटरी नंतर अलाहाबादला हलवण्यात आली. स्टँडर्ड टाईम आणि बॉम्बे टाईममधला फरक बराचसा कमी झाला व मुंबईने स्टँडर्ड टाईम

स्विकारला. आसाममध्ये ‘चायबागान टाईम किंवा टी गार्डन टाईम’ ही अनधिकृत वेळ अजूनही पाळली जाते, जी स्टँडर्ड टाईमपेक्षा एका तासाने पुढे आहे.

आता भारताचा स्टँडर्ड टाईम दिल्लीतील नॅशनल फिजिकल लॅबोरेटरी मध्ये असलेल्या ॲटॉमिक क्लॉकनुसार ठरवला जातो. भारताच्या पूर्वेकडील भागांसाठी वेगळा टाईम झोन करावा यासाठी सध्या पुन्हा समिती स्थापन करण्यात आली असून या विषयावर समितीच्या सदस्यात चर्चा सुरू आहे.

अवांतर - हा लेख लिहिताना मला इतकी वर्षं पडलेला एक प्रश्न सुटला, अगदी ७०च्या दशकापर्यंत लग्नपत्रिकेत लग्नाची वेळ लिहिताना त्यापुढे स्टँडर्ड टाईम (स्टँ. टा.) असे का लिहिले जात असे, हे मला समजलं.

मूळ लेख : https://dhaandola.co.in/2017/11/25/indian_standard_time/

या विषयावरील सब्यसाची चटर्जी यांचा लेख वाचा : https://www.sandarbhsociety.org/pdf/Issue-130/Week-08-AamneSamne-Issue-130-Shaikshanik-Sandarbh-Jun-Jul-2021.pdf

§§§

---

**लेखक : यशोधन जोशी.** इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या क्षेत्रात कार्यरत, ‘धांडोळा’ या त्यांच्या ब्लॉगवर कुतूहलापोटी घेतलेल्या शोधातून लेख लिहितात.

**इ-मेल :** dhaandolablog@gmail.com

*(कळीचे शब्द:- टाईमझोन, मद्रास टाईम, बॉम्बे टाईम, ग्रीनीच मेरिडीअन टाईम (GMT), युनिव्हर्सल टाईम (UTC), स्टँडर्ड टाईम, चायबागान टाईम, नॅशनल फिजिकल लॅबोरेटरी)*

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. २०१८ सालापासून 'शैक्षणिक संदर्भ' हा इ-अंक इ-मेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून आपल्यापर्यंत आम्ही नियमित पोहोचवत आहोत.

आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला sandarbh.marathi@gmail.com वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील. आपला व्हॉट्सॅप क्रमांक कळवल्यास आपल्याला Sandarbh Readers या आमच्यावाचक गटामध्ये सामील केले जाईल. तेथेही आपण लेख व अंक वाचू शकाल.

www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंक त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत. वाचू शकता, डाऊनलोड करू शकता.

या उपक्रमासाठी आपली ऐच्छिक देणगी संदर्भ सोसायटीकडे खालील अकाऊंटमध्ये जमा करू शकता, केल्यानंतर वरील इ-पत्त्यावर तशी मेल करा. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.

इ-पेमेंट : Sandarbh Society
Account No.: 20047006634
Bank of Maharashtra, Mayur Colony, Pune
IFS Code: MAHB0000852

***- संपादक मंडळ,शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***